**मे. शांती जी. डी. इस्पात व पॉवर प्लांट प्रा. लि. ५०४, राजीव गांधी कॉम्प्लेक्स, बाल आश्रम कम्पाउंड, कचेरी चौक, रायपुर, छत्तिसगड यांच्या मौजा-मानेगाव रीठी येथील सर्व्हे क्र. १०७, १४४, १४५, १४८, १४९, १५० व १५१, तहसिल - रामटेक, जिल्हा — नागपुर, जिल्हा येथील वन जमिन ९९.९५ हेक्टर व शासकीय जमिन ५.०५हेक्टर असे एकुण १०५ हेक्टर या क्षेत्रात ३,०६,०६५ टन/वर्ष मॅगनिज ओर (ROM) ओपन कास्ट पदधतीने उत्खनन घेणे प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत....**

---

मेसर्स शांती जी. डी. इस्पात व पॉवर प्लांट प्रा. लि. ५०४, राजीव गांधी कॉम्प्लेक्स, बाल आश्रम कम्पाउंड, कचेरी चौक, रायपुर, छत्तिसगड यांचे मौजा-मानेगाव रीठी येथील सर्व्हे क्र. १०७, १४४, १४५, १४८, १४९, १५० व १५१, तहसिल - रामटेक, जिल्हा —नागपुर, जिल्हा येथील वन जमिन ९९.९५ हेक्टर व शासकीय जमिन ५.०५ हेक्टर असे एकुण १०५ हेक्टर या क्षेत्रात ३,०६,०६५ टन/वर्ष मॅगनिज ओर (ROM) ओपन कास्ट पदधतीने उत्खनन घेणे प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि. १० जुलै २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मौजा-मानेगाव रीठी, प्रकल्प क्षेत्र, तहसिल - रामटेक, जिल्हा —नागपुर येथे संपन्न झाली.

मेसर्स शांती जी. डी. इस्पात व पॉवर प्लांट प्रा. लि. यांच्या वरील प्रस्तावित प्रकल्पाकरीता वने व पर्यावरण, हवामान बदल, मंत्रालय, भारत सरकार यांची पर्यावरण विषयक अनुमतीसाठी व मंत्रालयाने दिलेल्या टर्म्स ऑफ रेफरंसनुसार आवश्यक जाहिर लोकसुनावणीसाठी मंडळाकडे पत्र दि. १८/०५/२०२२ रोजी अर्ज सादर केला होता. त्यानुसार दि. १४/०२/२०२३ रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी आयोजित करण्यात आली होती. परंतु प्रकल्प प्रवर्तक यांचे निवेदन दि. १३/०२/२०२३ ला अनुसरुन समिती अध्यक्ष तथा जिल्हा दंडाधिकारी, नागपुर यांचे पत्र क्र. दि. १३/०२/२०२३ अन्वये सदरील सुनावणी पुढे ढकलण्यात आली. प्रकल्प प्रवर्तक यांनी नव्याने पुन्हा अर्ज दि. ०२/०५/२०२३ रोजी सदरील प्रकल्पाबाबत पुर्नःश्च पर्यावरण अनुमती करीता पर्यावरण विषयक लोक जाहीर सुनावणी घेण्याकरीता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे सादर केला.

पर्यावरण आघात मुल्यांकंन, अधिसुचना दि. 14 सप्टेबर 2006 व २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार जाहिर लोकसुनावणीचे स्थळ, दिंनाक व वेळ, मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांची मंजुरी घेऊन निश्चित करण्यात आली होती.

मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-२३०६१४-FTS-०११८ दि. १४/०६/२०२३ अन्वये सदर जाहिर लोकसुनावणी दि. १०/०७/२०२३ रोजी दुपारी ११.०० वाजता प्रकल्प स्थळी घेण्याबाबत कार्यालयीन आदेश जारी केला होता. **(सहपत्र-१)**

या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीच्या सुचना मराठी वृत्तपत्र दैनिक लोकमत व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया मध्ये दि. ०७ जुन २०२३ रोजी प्रसिदध करण्यात आल्या. **(प्रत सोबत-२)**

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीकरीता मा. सुभाष चौधरी, अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर तथा अध्यक्ष, लोकसुनावणी समिती, सौ. हेमा देशपांडे, मा. प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर तथा सदस्य लोकसुनावणी समिती, श्री. राजेंद्र उ पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र.नि. मंडळ, नागपुर तथा समन्वयक लोक सुनावणी समिती, ग्रामस्थ, सरपंच, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावि संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, व मोठया संख्येने स्थानिक उपस्थित होते. या बाबतचे हजेरी पट सोबत जोडत आहे. **(सहपत्र क्रं ३)**

**<u>कार्यपध्दती व उद्देश :</u>**

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सर्वप्रथम श्री. राजेंद्र उ. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले ग्रामस्थ, सरपंच, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावि संस्था, चॅनलचे प्रतिनिधी, व मोठया संख्येने स्थानिक उपस्थित होते यांचे हार्दिक स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची प्रक्रिया सरु केली. समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार सदरील लोकजाहीर सुनावणी जनतेच्या माहितीसाठी लोकसुनावणी प्रसिध्दी सुचना दोन वृत्तपत्र जसे मराठी वृत्तपत्र दैनिक लोकमत व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया ३० दिवस आधी दि ०७ जुन २०२३ रोजी देण्यात आली होती. त्यामध्ये प्रस्तावित प्रकल्पाविषयी सुचना,विचार टिका टिप्पणी, आक्षेप, तोंडी तसेच लेखी स्वरुपात नोंदविण्याचे जनतेला व पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थांना आवाहन करण्यात आलेले होते.

तसेच प्रस्तावित मेसर्स शांती जी. डी. इस्पात व पॉवर प्लांट प्रा. लि. ५०४, राजीव गांधी कॉम्प्लेक्स, बाल आश्रम कम्पाउंड, कचेरी चौक, रायपुर, छत्तिसगड यांचे मौजा-मानेगाव रीठी येथील सर्व्हे क्र. १०७, १४४, १४५, १४८, १४९, १५० व १५१, तहसिल - रामटेक, जिल्हा –नागपुर, जिल्हा येथील वन जमिन ९९.९५ हेक्टर व शासकीय जमिन ५.०५ हेक्टर असे एकुण १०५ हेक्टर या क्षेत्रात ३,०६,०६५ टन/वर्ष मॅगनिज ओर (ROM) उत्पादन घेण्याच्या प्रकल्पासंबंधी पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडाचा मसुदा, कार्यकारी सारांशच्या प्रती जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी स्थानीक मराठी भाषेत व इंग्रजी भाषेत भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि १४ सप्टेंबर २००६ च्या

अधिनियमान्वये व सुधारीत अधिनियम दि ०१ डिसेंबर २००९ च्या तरतुदीनुसार अभ्यासण्याकरीता खालील अधिसूचित स्थानिक कार्यालये व ग्रामपंचायती येथे उपलब्ध करण्यात आले आहेत.

| |
|---|
| १.पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, 15 वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32. |
| २.सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, 2 रा व 4 था माळा, सिनेप्लानेट सिनेमासमोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई-400022. |
| ३.जिल्हाधिकारी कार्यालय,सिव्हिल लाईन्स, जि.नागपुर. |
| ४. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर. |
| ५.उप-प्रादेशिक कार्यालय-1, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, 5 वा माळा, उदयोग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर. |
| ६.जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन्स, नागपुर, जि. नागपुर. |
| ७. जिल्हा उद्योग केंद्र, उद्योंग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर, जि. नागपुर. |
| ८.उप-विभागीय अधिकारी, रामटेक, ता. रामटेक, जि. नागपुर. |
| ९.तहसिलदार कार्यालय, तहसिल कार्यालय, रामटेक, ता. रामटेक, जि.नागपुर. |
| १०. ग्रामपंचायत आसोली, ता.रामटेक, जिल्हा - नागपुर. |
| ११. ग्रामपंचायत भांडारबोडी, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| १२. ग्रामपंचायत भोंडेवाडा, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| १३. ग्रामपंचायत बोथीया पालोरा, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| १४. ग्रामपंचायत बोरी, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| १५. ग्रामपंचायत दाहोडा, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| १६. ग्रामपंचायत डोंगरी, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| १७.ग्रामपंचायत हिवरा, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| १८.ग्रामपंचायत किरणापुर, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| १९.ग्रामपंचायत मंडरी, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| २०. ग्रामपंचायत महादुला, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |

| |
|---|
| २१ग्रामपंचायत मुसेवाडी, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| २२.ग्रामपंचायत नवरगाव, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| २३.ग्रामपंचायत पांचाला (बु.), ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| २४.ग्रामपंचायत पिंडकेपार (एस.), ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| २५. ग्रामपंचायत रामटेक, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| २६.ग्रामपंचायत सालई, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| २७.ग्रामपंचायत सिवनी भोंडकी, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| २८.ग्रामपंचायत सोनेगाव, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| २९.ग्रामपंचायत सोनेघाट, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |
| ३०. ग्रामपंचायत उमरी, ता.रामटेक, जिल्हा-नागपुर. |

वरील नमुद अधिसुचित शासनाच्या विभागाला देखील त्यांनी त्याच्या स्तरावर सदरहु पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची बाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अश्या प्रकारे ज़ाहीर जनसुनावणी बाबद अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पदधतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्प बाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टिका, टिप्पणी, सुचना व आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोयीचे होईल.

सदरहु जाहिर लोकसुनावणीच्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ यांना लेखी तथा ईमेल व्दारे ५१८ सुचना प्राप्त झालेल्या आहेत.

सदरील समिती ही फक्त लोकांचे सदरील प्रकल्पाबाबतचे मत नोंदविण्याकरीता असुन कोणालाही निर्णय घेण्याचा अधिकार या समितीस नाही. जनसुनावणीमध्ये उपस्थित मुददयांचा व प्रकल्प धारकांनी दिलेल्या उत्तरास अनुसरुन बैठकिचे इतिवृत्त राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्रधिकरण समिती कडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मार्फत सादर करण्यात येईल.

सदरील प्रकल्पाविषयाच्या कोणालाही लेखी निवेदन/सुचना /हरकती घ्यावयाचे असल्यास त्यांनी प्रकल्प धारकांचे सादरीकरण केल्यानंतर आपले नाव, गावाचे नाव सांगुन प्रश्न, सुचना, हरकती, विचारु शकताता या प्रश्न उत्तराच्या कार्यवाहीची नोंद जशीच्या तशी घेऊन या जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त राज्यस्तरीय आघात मुल्यांकन प्राधिकरण समिती कडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, मुंबई यांच्या मार्फत पाठविण्यात येईल. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेतील.

समन्वयक, यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत प्रकल्पा संबंधिची पर्यावरण अनुमतीच्या प्रस्तावाकरीता पर्यावरण विषयक लोकजाहीर सुनावणीची सादरीकरण करण्याची सुचना केली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पा विषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रमुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

**प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती**

- पर्यावरणविषयक मान्यतेची गरज व प्राप्त मान्यता
- प्राप्त व प्रक्रिये अंतर्गत मान्यता
- प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिज्येतील क्षेत्राचा पर्यावरणीय माहिती
- स्थळदर्शक नकाशा
- प्रकल्प क्षेत्राचा गुगल अर्थ नकाशा
- प्रकल्प क्षेत्राचा १० कि.मी. त्रिज्येतील स्थळदर्शक नकाशा
- वन्यजीव संरक्षण योजना : आर्थिक तरतुद
- उत्पादन रुपरेषा
- मानसिंगदेव WLS पासूनचे अंतर
- प्रस्तावित पाण्याची आवश्यकता
- जल वायु व ध्वनी निरीक्षण स्थळ क्षेत्र
- वन्यजीव संरक्षण योजना
- वायु पर्यावरण गुणवत्ता
- सरफेस प्लांट
- प्रस्तावित वायु प्रदुषण नियंत्रण प्रक्रिया
- विदयमान आणि प्रस्तावित भु-वापर
- भुजल संसाधनावर प्रभाव
- प्रस्तावित वाहतुक मार्ग
- ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्रक्रिया
- परिवेशी वायु निरिक्षण स्थानकांचे विवरण
- संकटकालीन व्यवस्थापन योजना
- प्रस्तावित प्रकल्पामुळे परिवेशी वायु मध्ये (PM१०) ची अनुमानित वाढ
- पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी अंदाजपत्रक (भांडवली)
- प्रस्तावित भु-कंपन नियंत्रण उपाय
- घनकचरा नियंत्रण
- वन्यजीव संरक्षण योजना
- प्रस्तावित वृक्षारोपण कार्यक्रम
- भुपृष्ठ – भुजल नमुना स्थळे
- प्रस्तावित प्रकल्पाचे फायदे

उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, नागपुर-१ तथा समन्वयक गठीत लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित असलेले प्रतिनीधी यांना सदरील पर्यावरण विषयक जनसुनावणीचे उद्दीष्ट पुर्ण होण्याकरीता आपले मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना/हरकती मांडण्याबाबत आवाहन केले.

## जनसुनावणी नोंद (प्रोसीडींग) :

| अ. क्रं. | उपस्थितांनी उपस्थित केलेले मुद्ये | जनसुनावणी समितीने दिलेली प्रतिक्रिया सुचना |
|---|---|---|
| १ | **श्री. बब्बु खान पठान, सामाजिक कार्यकर्ता, मानेगाव, तह. रामटेक, जि. नागपुर यांनी असा मुददा उपस्थित केला कि :-**<br>• जी. डी. इस्पात जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती माहिती भारत सरकारकडे किंवा महाराष्ट्र सरकारकडे शपथ पत्राच्या व्दारे लिहुन दिली आहे का? ॲफीडेवीट दिले आहे का ?<br>• या भागातील जवळपास ३५ हजार झाडे कापली जाणार आहेत. रामटेक तालुक्यात आचार्य नागार्जुन यांनी आयुर्वेदिक व रासायनिक प्रयोग केले असल्याची इतिहासामध्ये नोंद आहे. हे सर्व प्रयोग आसपासच्या जगलातील औषधी वनस्पती असल्याने संशोधन झाले आहे. या औषधी वनस्पती नष्ट होतील.<br>• ती ३५ हजार झाडे यवतमाळ जिल्हयात ३०० किलोमिटर दुर लावली जाणार आहेत याचा परीसरास फायदा होणार नाही.<br>• ५८ फुट खाण खोदणार आहे, मोठे पंप लावणार आहेत त्यामुळे पाण्याची पातळीत घट होणार.<br>• खाणीच्या उत्खननामुळे जी मोठया प्रमाणात माती निघणार आहे ती कुठे टाकणार. अयोग्य रीत्या टाकल्यास धरणात, तलावात, शेतात, नदीमध्ये येणारे पिण्याचे पाणी मिळणार नाही.<br>• आज कार्बनडाय ऑक्साइड, मॅगनिजडाय ऑक्साईड इत्यादी घटक पदार्थ जे डंपिंग मुळे खाली जमिनीत जाईल त्यामुळे पिण्याचे पाणी दुषित होईल.<br>• या प्रकल्पामध्ये वाघाचे, हरीणीचे वास्तव्य आहेत हे कंपनीने नाकारलेले आहे. तसेच हा वाघाचा कॉरीडोर आहे. वाघाला खायला डुक्कर, हरीण, म्हशी, गाय तसेच इतर वन्य प्राणी खाण्यासाठी मिळाले नाही तर गावात शिरुन माणासांना खाईल.<br>• या प्रकल्पामुळे वन्य प्राणी विस्थापन होणार आहे. मग त्यांना जागाच राहणार नाही मग हे वन्य प्राणी मानवी वस्तीत येऊन व मानव संघर्ष निर्माण होईल याचे विश्लेषण केलेल नाही.<br>• या खाणीमध्ये फक्त ४२ लोकांना रोजगार मिळणार आहे परंतु त्यांना कोणत्या प्रकारचे रोजगार मिळणार आहे याची माहिती दिलेली नाही.<br>• माझ्या शेतापासुन या खाणीचे अंतर १ किलोमिटर आहे. कधीकधी माझ्या शेताजवळ हरीण व वाघ येतात परंतु शेतीला कुंपन असल्यामुळे ते आतमध्ये येत नाही. यामुळे पर्यावरणाचे नुकसान | सदस्य, जन सुनावणी समिती यांनी सांगितले की, सर्व प्रश्न मुददे उपस्थित करा त्याच्या नंतर प्रकल्प प्रवर्तकांना सागु की ते उत्तर देतील.<br>मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, आपण जे बोलले आहे त्यांची नोंद करुन घेत आहोत. आणि हे सर्व जे मुददे आहे ते वेगवेगळे यंत्रणेशी संबंधीत आहे. आजच्या या प्रासेडिंग मध्ये यांची नोंद घेऊन, त्या यंत्रणेपर्यंत आपले मुददे पोहोचवतो. |

| | | |
|---|---|---|
| | होईल आणि मानवी जिवनावर, आरोग्यावर परीणाम होईल त्यामुळे माझा या प्रकल्पाला विरोध आहे. हा प्रकल्प रदद करावा. | |
| २ | **श्री. बाबा देशपांडे, नागपुर यांनी असा प्रश्न उपस्थित केला कि :-** जी झाडे तोडणार आहात त्याच व्हेलुऐशन तुम्ही केलेल आहात का? ऑक्सीजन किंवा मटेरीअल बेसीस वर त्याच व्हेलुएशन तुम्ही डिक्लेअर केल पाहीजे आणि त्याच्यातील जी तफावत आहे जी देखील डिक्लेअर केली पाहिजे की जेणेकरुन आम्हाला असे पटेल किंवा झाडांच्या व्हेलुएशन अस आहे की, त्या कंपनीच्या डेट पेक्षा महत्वाच आहे. झाडाच जगन त्या कंपनीच्या व्हेलुएशनपेक्षा जास्त महत्वाच राहणार आहे. | -- |
| ३ | **श्री. सुबोध अवधी, वणी यांनी असा मुददा उपस्थित केला कि:-** मी अनेक वर्षापासुन कन्झरवेशन मध्ये काम करीत आहे. मी खदानग्रस्त भागातुन येतो, खदानीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. खदान झाल्यामुळे ट्रकांच्या वाहतुकीमुळे वस्तीतील रस्त्याचे नुकसान होईल. खदानीतुन जी धुळ उत्पन्न होईल ती शेतकऱ्यांच्या शेतीवर जाऊन पिकांचे नुकसान होईल. माझ्या गावाजवळ ताडोगा व टिपेश्वर खदान त्यामुळे वन्य प्राणी वणी शहरात सुदधा येतात. मातीच्या ढिगाऱ्यामुळे पाणी अडुन पाण्याचा निचरा होणार नाही. खदानीमुळे वन्य प्राणी गावात येऊन मानवी वन्य प्राणी यांच्यात संघर्ष निर्माण होईल. खदान झाली तर खदान माफीयात वाढ होऊन गुन्हेगारीत वाढ होईल. त्यांनी विनंती केली की, या खाणीचा सगळया बाजुनी विचार करुन योग्य तो निर्णय घ्यावा. | मा. अध्यक्षांनी सुचित केले की, पुढचा प्रश्न उपस्थित करा. |
| ४ | **श्री. ऋषीकेश यांनी असा प्रश्न उपस्थित केला कि :-**<br>• जी खाण प्रस्तावित आहे तिथे नवीन लिज देत आहात काय हे बरोबर आहे काय आणि किती लोकांना विश्वासात घेतलेले आहे. दुसरी गोष्ट अशी की, मनसर येथे मॉइलची कमीत कमी १५० वर्षे चालणारी खाण आहे. ती चालु असतांना या प्रकल्पाची काय गरज आहे.<br>• ३५०० एकर मध्ये खिंडसी जलाशय आहे त्यामध्ये पहाडातुन येणारे पाणी जाऊन मिळते. या पाण्याचा वापर लोकांना पिण्याकरीता व शेतपिका करीता करण्यात येतो. सदरील खदानीमुळे तेथील प्रदुषीत पाणी खिंडसी जलाशयाला जाऊन मिळणारच आहे त्याकरीता प्रकल्प प्रवर्तक यांनी काय नियोजन करणार आहे. ते जाऊ नये याकरीता व ते जाणार आहे या बाबतची काय खबरदारी घेणार आहात याचे उत्तर मला पाहिजे. | -- |
| ५ | **श्री. संजय झाडे यांनी असा मुददा उपस्थित केला की :-**<br>• हे खाण सुरु होणार आहे किंवा नाही तुमची जनसुनावणी काय निर्णय घेईल हे निर्णय समितीच्या माध्यमातुन सरकार समोर तुम्ही मांडणार आहात काय, तुम्ही मंजुरी दिली तर आम्ही काही करु शकणार नाही.<br>• हे गाव दोन दिशांमध्ये विभागलेले आहे. एक म्हणतात की ही खाण सुरु व्हायला पाहिजे तर दुसरे म्हणतात पर्यावरणावर इफेक्ट होणार | -- |

| | | |
|---|---|---|
| | आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये जे नुकसान होणार आहे त्याच्याकरीता कंपनीने काय उपाय योजना केलेली आहे ते सर्वप्रथम प्रत्येक ग्रामपचायतीमध्ये फॉलोप घ्यायला पाहिजे. गावामधील खाणीमुळे याचा नुकसान किंवा फायदा होणार आहे याची माहितीच नाही दिली तर दोन मत निर्माण होणार आहे. आतापर्यंत हा अनुभव आहे की जिथे जिथे खाण निर्माण झालेली आहे. तिथे तिथे खाण निर्माण झाल्यानंतर तेथील लोकांना काय मिळणार आहे याची माहिती नसते. येथे खाण निर्माण झाली पाहिजे परंतु पर्यावरणाचे नुकसान नाही झाले पाहिजे, शेतकऱ्यांचे नुकसान नाही झाले पाहीजे. शक्यतो आमचे रस्ते खराब झाले तर लोक विस्तापीत झाले तर त्यांना किती निधी मिळणार आहे. या खाणीमुळे बाधीत गावांना काय काय पर्यायी योजनांचा लाभ मिळणार आहे हे प्रत्येक ग्रमपंचायतीला सांगितले पाहिजे.<br>• रामटेक हा क्षेत्र सगळयात जास्त खाणबाधीत क्षेत्र आहे. या खाणीमध्ये ज्या ४२ लोकांना रोजगार मिळणार आहे तो कोणत्या स्वरुपाचा आहे त्यांना कामावर कायम स्वरुपी ठेवणार आहात की, अंशकालीन कामावर ठेवणार आहात तसेच ते काम कोणत्या स्वरुपाचे आहे याची माहिती दिली पाहीजे.<br>• तसेच ३० हजार झाडे तोडुन ती यवतमाळ ला लावणार आहात त्याचा आम्हाला काय फायदा होणार आहे. आमचा खाणीला विरोध नाही परंतु आमच्या लोकांना रोजगार मिळाला पाहिजे, आमचे जंगल वाचले पाहिजे, रस्ते खराब झाले नाही पाहिजे, अन्यथा आम्ही विरोध करु हा आमचा आक्षेप आहे.<br>• हा जंगल आमच्या आदीवासी लोकांनी बनविलेला आहे हा क्षेत्र गावकरांचे लोकांचे आहे. त्यामुळे हा जंगल नष्ट करुन नये याची काळजी घेतली पाहीजे. तरी खाणीला मंजुरी देत आहात किंवा नाही देत आहात, काय निर्णय होईल हे मला माहिती आहे तरी खाण पुर्णपणे योग्य पदधतीने झाले पाहिजे, जर ते होत नसेल तर तीनही गावातील लोक रस्त्यावर येऊन खाण सुरु होऊ देणार नाही असे माझे मत मांडत आहे. | |
| ६ | **श्री. राहुल बबनराव कोठेकर, रामटेक वाईल्ड चॅलेंजर ऑरगनेशन चे अध्यक्ष, यांनी असा मुददा उपस्थित केला की :-**<br>• आम्ही १२ वर्षापासुन ही संस्था या क्षेत्रात काम करीत आहे. या क्षेत्रामध्ये वाघ हा मुख्य प्राणी असुन इतर अनेक दुर्मीळ प्रकारचे पशु पक्षी व सरपटणाऱ्या प्राण्याचे वास्तव्य येथे आहेत. कंपनीने रीपोर्टमध्ये वाघांची संख्या किती आहे हे नमुद केलेले आहे का, येथे जवळपास मोगलकसा व पेंच प्रकल्प आहे. हा क्षेत्र वाघासाठी संरक्षित क्षेत्र घोषीत झाल्यानंतर पर्यटनामुळे रोजगार आपोआप | मा. अध्यक्ष महोदय यांनी उपस्थितांमध्ये गुगुलडोह चे कोणी आहेत का, या बाबत विचारणा केली. |

| | | |
|---|---|---|
| | निर्माण होईल व स्वयं रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. येथे खाण न होता हा क्षेत्र वाघांसाठी संरक्षित क्षेत्र घोषित करावा.<br>• दुसरा मुददा असा आहे की, या रस्त्याची व्यवस्था खराब होईल. खदानीमुळे खदान माफीयात वाढ होऊन गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होईल. खदानीतुन निघणाऱ्या ओव्हर बर्डनमुळे, हवेमुळे आजुबाजुच्या परीसरात धुळ उडवुन परीसरातील शेतपिकांवर बसते व वातावरण खराब होऊ शकते, त्यामुळे शेती पिकांचे नुकसान होते. या जंगलात विविध पशु प्राणी पक्षाचे वास्तव्य आहे म्हणुन हा प्रकल्प होऊ नये व गुगुलडोह हा क्षेत्र वाघासाठी संरक्षित क्षेत्र घोषित करावा असे केंद्र सरकारकडे शिफारस करावी अशी विनंती केली. | |
| ७ | **श्री. जगदिश दास, यांनी असा मुददा उपस्थित केला की आम्ही,**<br>• मी कोर्टामध्ये पी. आय एल नं. ३४/२०२३ दाखल केलेला आहे व पुढे असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तकाने जे सादरीकरण केले आहे त्यामध्ये काही फरक आहे. जसे की कंपनीने मंजुरी करीता व काही वेगवेगळया कारणास्तव कागदपत्र दाखल केले आहेत ते मी सोबत आणलेले आहेत व लेखी सुदधा दिले आहे.<br>• आपल्या माहितीस्तव सांगु इच्छितो की, मॅगनिज माईन मध्ये तिथे १९९९-२००० मध्ये जिओलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया यांनी अभ्यास केलेला आहे त्या रिचर्स मध्ये असे नमुद केले आहे की, या जागेत २५-३० प्रतिशत मॅगनिज कॅटगराईज लो ग्रेड व हायग्रेड सीलीका कोर असुन मॅगनिजची गुणवत्ता ही लो ग्रेड ची असुन सुदधा कंपनीला ही खाण या जागेवरच का पाहीजे व पुढे असे सांगितले की रीसर्च पेपर च्या निष्कर्षा मध्ये असे नमुद आहे की, ड्रिलिंगने हे सिद्ध केले आहे की खाली खोल विस्तार खूपच मर्यादित आहे, व ५ वर्षामध्ये काय निघेल हे कंपनीला सुदधा माहिती नाही.<br>• दुसरा मुददा उपस्थित केला की, फॉरेस्ट क्लिअरन्स व इन्व्हारमेंटर क्लिअरन्स करीता जी कागदपत्र दाखल केली आहे ती आम्ही कोर्टात सुदधा दिलेली आहे.<br>• सादरीकरणामध्ये कंपनीने किती लोकांना रोजगार देणार आहे त्याची माहिति सांगितली आहे ग्रामस्थांना पर्यावरण व रोजगार पाहिजे असते सादरीकरणामध्ये रोजगार देणार आहात का, त्यावर कंपनीने होय असे म्हटले आहे त्यामध्ये १० रेग्युलर व ४० कॉन्ट्रॅक्टवर घेणार आहेत जेव्हा की, त्यांनी सादरीकरणात ४२ असे दाखविले आहे.<br>• वाईल्ड लाईफ इन्स्टीटयुट आफ इंडीया च्या टेलीमेंट्री डाटा च्या अहवालानुसार गुगलडोह परीसर हा वन्यजीवांसाठी संरक्षीत क्षेत्र आहे याची माहिती मी कोर्टात सादर केली आहे असे सांगितले. वाघाला शिकार मिळत नसल्यामुळे जिथे जिथे खाण आहे त्या | मा. अध्यक्ष महोदय यांनी सांगितले की,<br>• कोर्टा मध्ये पी. आय. एल. दाखल केले आहे आणि त्या पी. आय.एल. च्या सुनावणीमध्ये कोर्टानी सांगितले आहे की, लोकांचे जे म्हणणे आहे ते आधी तुम्ही ऐकुण घ्या म्हणुन आपण कोर्टाच्या आदेशानुसारच ही आजची सुनावणी घेत आहोत.<br>• आपले जे म्हणणे आहे ते शांततेत मुददेसुद व थोडक्यात मांडायचे आहे. कोर्टामध्ये निर्णय अजुनही प्रलंबित आहे.<br>• अजुन एक ऑथोरीटी आहे तुमच्या प्राजेक्ट बददल निर्णय घेणार आहे. हे सर्व मुददे उपस्थित केले आहे ज्या एनजिओने हायकोर्टात उपस्थित केलेले आहे आणि हायकोर्टाने रीलीफ दिला तर दोन्ही बाजु ऐकुण निर्णय घेणार आहेत, तो निर्णय आपणा सर्वांना बंधनकारक राहणार आहे.<br>• सर्व गावकऱ्यांना विनंती आहे की, कोर्टामध्ये प्रकरण ऑलरेडी गेलेल आहे लोकांचे जे म्हणणे आहे ते आधी ऐकुण घ्या त्या अनुषंगाने आपल्याला इथे |

| | | |
|---|---|---|
| | परीसरामध्ये रोज एका व्यक्तीचा मृत्यु होतो तथा मानव वन्यजिव संघर्ष निर्माण होतो.<br>• या डोंगराच्या दोन्ही बाजुला दोन तलाव आहेत त्या तलावाला या डोंगरातुन पाणी मिळते, ते पाणी सुरनदी च्या माध्यमातुन खिंडसी तलावात जाते आणि खिंडसी तलावातील पाणी पुर्ण रामटेक शहराला मिळते. व या पाण्याचा वापर पिण्यासाठी व शेतीसाठी करण्यात येतो. प्रतीदीन ३.५ केएलडी पाण्याचा उपसामुळे पाण्याच्या पातळीमध्ये घट होऊन पाण्याची पुर्तता पिण्यासाठी व शेतीसाठी कमी होणार आहे. व आपणास ज्या ४० लोकांना रोजगार मिळणार आहे तो फक्त ५ वर्षासाठी असुन तरी आपण ते समजुन घ्या या पर्यावरणास प्रचंड व्याप्ती आहे. | कोणाला आव्हान करायचे नाही आहे कोर्टामध्ये प्रकरण ऑलरेडी आहे. कोर्ट निर्णय घेणार आहे. जे आपण मुददे मांडले ते आपण कोर्टापुढे ठेऊ. |
| ८ | **श्री. श्रीकांत देशपांडे, नागपुर इथे सर्वांनी सर्व मुददे मांडले आहे, की आपण पुढचा पिढीसाठी काय करणार आहे.**<br>• मी शेतकरी आहे, शेती करतो मी शेतकऱ्यांचे वती त्याच्या भावना मांडणार आहे. मी पर्यावरणाकरीता मागच्या ३५ वर्षापासुन लढाई चालु आहे. मी पुढच्या महिन्यात ५० वर्षाच्या होणार आहोत मी मरेपर्यंत लढाई चालु ठेवणार आहे. माझा एकच प्रश्न आहे सगळयाना माईनिगच सर्व गोष्ट माहित आहे.<br>• इथे तर झाल पेंच आयलंड बनुन जाईल नवेगाव नागझिरा आयलंड बनुन जाईल इतर वाईल्ड ॲनिमल थांबुन जाईल, मोगलझरा व्हाईल्ड कोरोडाईड होऊन रोजगार मिळु शकतो. आपण एका रात्रीत जंगल तयार करु शकत नाही. जंगल तयार होण्याकरीता शेकडो वर्षे लागतात. जी.डी.पी.आर. मध्ये ३५ हजार झाडे कापली जाणार आहेत ते खरेच नोंदवले आहे काय, आमच्या मते ती दोन लाखांच्या वर आहेत. त्या झाडांची असीसमेंट व्हायला पाहीजे. सुप्रीम कोर्टाच्या एका समितीने सांगितली आहे का, झाडांची इन्वारमेंटल व्हॅलुएशन काढा, लाकडांची किंमत काढु नका, त्यांनी किती ऑक्सीजन दिल आहे तेव्हा तुम्हाला कळेल की या छोटयाशा प्रकल्पासाठी पर्यावरणाचा लाखो करोडोच नुकसान करणार आहे काय, ती राष्ट्रीय संपती आहे. आपण मॅगनिज काढतो आणि ६० % एक्पोर्ट करतो ते कशासाठी, जर खिंडसी धरणाच पाणी या प्रकल्पामुळे खराब झाला किंवा पाण्याची पातळी कमी झाली त्यासाठी काय उपाययोजना केली.<br>• खिंडसी तलावाच इंन्व्हारमेंट इंपॅक्ट एसेंसमेट केल गुगुलडोह च इन्व्हारमेंट इंपॅक्ट एसेंसमेट केले हे काय सुप्रीम कोर्टाचे आदेशांचे पालन केले आहे का. माझे ऐवढेच म्हणणे आहे की, पैदावाराची संख्या वाढणार आहे आणि शेत जमिनीची संख्या कमी होणार आहे, मग तुम्ही खाणार काय आहे. येणाऱ्या काळामध्ये आलमारी उघडली की पैसे पडतील पुढच्या पिढीली खायला अन्न मिळणार नाही. परिणामत: आपली परीस्थिती पाकिस्तानासारखी किंवा श्रीलंकेसारखी होईल. येणाऱ्या काळामध्ये आपल्याला कळेल की, | -- |

| | | |
|---|---|---|
| | गुगलडोह प्रकल्पाला विरोध असतांना हा प्रकल्प झाला तेव्हा आपल्या मुलांच्या डोळयात पाणी येईल. माझे म्हणणे असे आहे की, या पुर्ण प्रकल्पाचा इन्वारमेंटल असेसमेंट व्हायला पाहीजे. माझे या प्रकल्पाला विरोध आहे. | |
| ९ | **डॉ. राजेश ठाकरे, सर्कल प्रमुख,**<br>• या ठिकाणी ही माईन होऊन नये त्यापासुन स्थानिक नागरीक पासुन शेतकरी तसेच सगळयांचीच नाराजी आहे. या माईनच्या माध्यमातुन काही षडयंत्र सुदधा आहे. पर्यावरणाच संरक्षण झाले पाहिजे सर्व लोकांचे मागणी आहे की इन्वारमेंटल असेसमेंट सुर्पीम कोर्टानुसार गाईडलाईन्स नुसार व्हायला पाहीजे.<br>• नॅचरल रिचर्सच्या माध्यमातुन खिंडसीतुन वॉटर प्रुफ कोटा आहे. खदानीकरीता खुप मोठया प्रमाणात पाण्याचा उपसा होणार असल्यामुळे आमच्या विहीरी, बोरवेल आणि तलावाच्या पाण्याची पातळी कमी होऊन सिंचनासाठी त्रास होणार नाही.<br>• तसेच ब्लास्टींग मुळे आजुबाजुच्या परीसरांना शाळांना त्रास होणार असेल, रोजगार मिळणार नसेल, जनावरांना त्रास होणार असेल तर मला असे वाटते की हा प्रोजेक्ट इथे व्हायला नाही पाहिजे. माझे या प्रकल्पाला विरोध आहे. | मा. अध्यक्षांनी सांगितले की, शॉर्ट मध्ये सांगा, ज्याच्याकडे नविन प्रश्न असेल ते बोला. |
| १० | **श्री. आशिष मासुळकरे, माजी सरपंच, मांद्री,**<br>• खाणीला आमचा विरोध आहे. आज जन सुनावणीमुळे पर्यावरण वाचले पाहीजे, जंगल वाचले पाहिजे, यासाठी जे नेते आले आहेत पण जेव्हा शेतकरी अडचणीत असतो तेव्हा मात्र कोणीच येत नाही. आज जे नेते सांगत आहे की मी शेतकरी आहे परंतु ते शेतकरी नाही. शेतकऱ्याला जेव्हा प्राण्यांचा त्रास होतो तेव्हा त्याला नाईलाजास्तव झाड कापावी लागते. यासाठी शासनाला त्या शेतकऱ्याकरीता नियोजन करायला पाहिजे.<br>• आमच्या शेतीला लागुनच जंगल असल्यामुळे रोज जंगली प्राण्यांचा सामना करावा लागतो तेव्हा मात्र कोणतीही एन.जी. ओ. संस्था आमच्या मदतीला येत नाही. शेतकरी वाचला पाहिजे म्हणुन कोणताही नेता येत नाही. मी घरची सगळी कामे सोडून शेतीत जातो कारण माझे पीक वाचले पाहिजे. माझे हेच म्हणणे आहे की, ज्याप्रमाणे आज जंगल वाचविण्याकरिता एन.जी.ओ संस्था आणि नेते मंडळी आले आहेत त्याचप्रमाणे आमचे शेतकरी जेव्हा अडचणीत असतो त्यावेळीस सुध्दा सगळ्यांनी आले पाहिजे.<br>• ज्या ४० लोकांना रोजगार मिळणार आहे ते आम्हाला मान्य नाही. शेतकरी वाचला तरच आपल्याला खायला अन्न मिळणार आहे. शेतकऱ्यांसाठी सगळ्या नेतेमंडळीनी एकत्र यायला पाहिजे. शेतकरी वाचवा लागेल. शेतकरी वाचवा, पर्यावरण वाचला पाहिजे. शासनाच्या नियम व अटीनुसार सगळी कामे व्हायला पाहिजेत.<br>• खदाणीतून निघणारे सर्व पाणी आमच्या शेतकरी बांधवांना मिळाले पाहिजे. खाण चालु होईल किंवा नाही. रोजगार मिळेल किंवा नाही. | समिती सदस्यांनी सांगितले की, हा प्रकल्प प्रस्तावित प्रकल्प आहे. याबाबतचा कोणताही निर्णय झालेला नाही. याचा निर्णय घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. आम्ही तुमचे मत जाण्यासाठी ऐकण्यासाठी आहोत. आपण आपले मत शांतपणाने बोला.<br>मा. अध्यक्षांनी सांगितले की, शेवटच्या टप्प्यात आले आहोत आपण, नविन मुददे असेल तर बोला. |

| | | |
|---|---|---|
| | झाडे लावण्यासाठी ५ हजार झाडे लावण्यासाठी रोजगार गावातील महिलांना दयायला पाहिजे.<br>• टायगर रीजर्व झाला पाहिजे परंतु टायगर रीजर्व झाल्यानंतर गावातील लोकांना राहता येणार नाही. | |
| ११ | **श्री. योगेश मात्रे, उपसरपंच**<br>माझी एकच विनंती आहे की, ही हिअरींग ठेवली आहे ती कोणासाठी ठेवली आहे तुम्ही शेतकऱ्याना बोलु दया, इथे बाहेरचे लोक, नेते येऊन बोलुन राहीले, इथे किती लोक शेती करताता, तुम्ही किंती झाडे शेतात लावली आहेत. इथल्या स्थानिक लोकांना व शेतकऱ्यांना बोलु दयावे. | -- |
| १२ | **सौ. पंचफुला अशोक टेकाम, गुगलडोह**<br>खदान नाही पाहिजे, पैसे घेऊन कुठ जाऊ, नाही तर आम्ही विष प्राशन करु करुन मरुन जाऊ, परंतु हा प्रकल्प होऊ देणार नाही. माझा या प्रकल्पाला विरोध आहे. | मा. अध्यक्षांनी सांगितले की, आपल म्हणण नोंदवत आहे. त्याची नोंद होत आहे. |
| १३ | **श्री. गज्जू यादव, रामटेक,**<br>• ही हीअरींग कोणसाठी ठेवली आहे लोकांसाठी आहे तर त्यांना बोलण्याची व्यवस्था करावी.<br>• आज गुगुलडोह मध्ये मे. शांती जी. डी. इस्पात, यांचा गुगलडोह येथे मॅगनिज धातुंचे उत्पादनाच्या परवानगीसाठी १०५ हेक्टरच्या लिजसाठी प्रस्ताव २०१८ मध्ये सादर करण्यात आला होता. माझ्या माहितीप्रमाणे त्याची प्रस्तावाची लिज ची अवधी २०२१ मध्ये संपलेली आहे. तरी कोणत्या राजकीय दबावामुळे चालु २ वर्षात मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरु आहे.<br>• विषय असा आहे की, आता एक नविन पॉलीसी आली आहे कोणत्याही धातुंची खदान सुरु करायची असेल केंद्राचे सॅक्युलर, तर त्याची ओपन बिडींग करायची असते. आणि ओपन बिडींग मध्ये जो जास्त रक्कम देईल त्याला खदान दिली जाते. त्याची सुरुवात दि. २७ डिसेंबर २०१८ रोजी मी प्रस्ताव दिला होता, तत्कालीन केंद्रीय मंत्री महेंद्र सिंग चौधरी यांना प्रस्ताव दिला होता.<br>• मी स्वत: एक जागरुक लोक प्रतिनिधी म्हणुन माहिती घेतली आणि त्यावेळेस असे आढळुन आले की, केंद्रीय सरकार तर्फे मॅगनिज ओर इंडिया लिमिटेड कडुन खदान उघडली गेली असती तर दीड एकरावर एका व्यक्तीला नोकरी मिळाली असती. आपला उददेश असा होता की, खाजगी शेत जमिन अधिग्रहीत करा व जंगल नष्ट करु नका, खुली जागा अधिग्रहीत करा, आणि खुली जागा अधिग्रहीत केली असती तर दीड एकर वर शेतकऱ्याला नोकरी मिळाली असती व मोबदला चांगला मिळाला असता सर्व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध झाल्या असत्या आणि तो शेतकरी केंद्र सरकारचा एंम्प्लॉय झाला असता. वन जमिन ९९.९५ हेक्टर व शासकीय जमिन ५.०५ हेक्टर परंतु मॅगनिज ओर इंडिया लिमिटेडच्या काही अधिकाऱ्यांनी हाताशी धरून या खाणीतून निघणारा माल अत्यंत खालच्या दर्जाचा असल्यामुळे आपण येथे | मा. अध्यक्षांनी सांगितले की, मुददयानुसार बोला, सर्व मुददे उपस्थित झाले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | खाण सुरू करू शकत नाही तसेच गुणवत्तपूर्ण माल येथे नाही, असे दर्शविण्यात आल्यामुळे येथे खाण उघडू शकत नाही.<br>• त्याचवर्षी तीच कागदपत्रे काढून मे. शांती जी.डी. इस्पात यांनी प्रस्ताव केला होता. आतापर्यत प्रस्ताव पेंडीग होता. त्यात ३६ हजार झाडे कापली जाणारे असे नमूद केले होते. परंतु तसे नसून येथे दोन लाखांच्यावर झाडे आहेत. झाडांना नंबरींग न देता कशी काय ३५ हजार झाडे मोजली. प्रस्तावित खदान पेंच प्रकल्प आणि नागझिरा प्रकल्पापासून जवळ असल्यामुळे तेथे वाघ, भालू, आणि चिता यांसारख्या जंगली प्राण्यांचे वास्तव्य आहे.<br>• आदिवासींना जे सरकार कडून पट्टे देण्यात येतात त्यामुळे जंगलाचे अस्तित्व नष्ट होऊन वाघासारखे हिंसक प्राणी आपल्या परिसरामध्ये दिसतात. आज येथे अनेक आदिवासी शेतकरी आहे ज्यांना सरकारकडून शेतीसाठी पट्टे मिळाले नाही. सरकारी कंपनीला खाण देताना एवढा पाठपुरावा केला गेला नाही परंतु या खाजगी कंपनीला खाण देताना एवढा पाठपुरावा केला जात आहे. २ लाख जुने झाडे जे दोनशे वर्षांपूर्वीचे झाडे कापून नवीन ५ लाख झाडे लावण्यात काही अर्थ नाही. २ लाखाच्या वर झाड कापल्या जातील. आपण स्थानिक महिलांकडून मनरेगाकडून लावू शकतो. झाडे इथली कापायची आणि ती यवतमाळमध्ये लावणे हे हास्यास्पद आहे. येथे सरकारी खाण उघडली असती, तर मोबदला चांगला मिळाला असता, चांगल्या दर्जाच्या आरोग्याच्या सुविधा आणि नोकरी मिळाली असती. आज चोखाळा, काचुरवाहीची खाण बघा. जेथे लोकांना रोजगार मिळालेला नाही. उच्च न्यायालय आणि वेळ पडल्यास सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन या विरुध्द लढाई लढणार आहे. | |
| १४ | **सौ. जहिन, नागपूर**<br>• येथे मातीचे मटके महिला आणि पुरुष बनविण्याचे व्यवसाय करतात आणि ती विकायला शहरात येतात जर ही खाण झाली तर ती माती खराब होईल आणि निकृष्ट दर्जाच्या मातीपासून बनविलेले मटके विकले जाणार नाही, याचा कोणी विचार केला नाही.<br>• दुसरा मुद्दा येथे दोन जुने आदिवासी मंदिर आहेत ते सुध्दा वाहतुकीमुळे नष्ट होऊ शकतात. हाही पर्यावरणाचा विषय आहे.<br>• तिसरा मुद्दा असा आहे की, तुम्ही हा जो खर्च करत आहात तो जर या लोकांकरिता किंवा शेतकऱ्यांकरिता केला तर त्याचा उत्पन्न वाढवण्याकरिता केला तर त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल.<br>• एक विनंती आहे या शेतकऱ्यांकरिता एक वर्कशॉप कप्यासिटी बिल्डींग त्यावर पूर्ण पैसा सरकारकडून खर्च केला गेला पाहिजे हे कंपनी करू शकणार नाही. यामध्ये महिलांना सुध्दा रोजगाराच्या संधी दिल्या पाहिजेत. | आज जन सुनावणी दरम्यान सर्व मुददे उपस्थित झाले आहे, काही नविन मुददे असेल तर बोला. |
| १५ | **श्री. हरिष उईके गोंडवाना गणतंत्र पक्ष, प्रदेश अध्यक्ष**<br>• हा आदिवासी बहूल समाज आहे. वनहक्क कायद्याअंतर्गत गुगलडोहला सुध्दा वनसमिती गठीत आहे. त्या वनसमितीच्या माध्यमातूनसुध्दा कोणत्याच प्रकारचा प्रस्ताव आपल्यापर्यंत | मा. अध्यक्षांनी सांगितले की, नविन मुददा असेल तर माईक वर बोला. |

| | | |
|---|---|---|
| | पोहोचलेला नाही. त्याचा सुदधा येथे विरोध आहे. वनहक्क अधिनियम-२००६, नियम २००८ अधिसूचनानुसार २०१२ च्या सुधारित कायद्याअनुषंगाने सामूहिक वनहक्क मौजा गुगलडोह ग्रामसभा पंचाळा तह. रामटेक येथील ग्रामसभा समस्त गावकरी यांना कलम ३ अन्वये १ अनुसार नुसार २५०.७६ एकर जमीन सर्वे ३६/३००, १०१ कलम १४४, २२२, २२६ प्रमाणे वनहक्क निस्तार सामूहिक निस्तार पत्रातील नोंदीनुसार, तरतुदीनुसार लागू होणार हक्क कलम ३/१ मधील परिच्छेद ख मधील नमूद केल्याप्रमाणे वहत वनउपज गावाच्या सीमांतर्गत वनउपज संकलन करणे व त्याचा वापर करणे या संदर्भात या वनसमितीला अधिकार मिळालेले आहे.<br>• दुसरी गोष्ट या क्षेत्रामध्ये जे माझे आदिवासी बांधव आहेत, त्यांची जमीन या प्रकल्पामध्ये जाणार आहेत. जल जंगल जमीनचा अधिकार हा आदिवासी समाजाला संविधानिक रित्या आधिपासुन प्राप्त आहे. हा प्रकल्पा उभारताना सर्वप्रथम आदिवासी बांधवाची परवानगी घ्यावी लागेल. परवानगी मिळत नसेल तर हा प्रकल्प उभारावा नाही तर उभारु नये. या प्रकल्पाला लागून गेटबा राजाचे देवस्थान आहे आणि दुसऱ्या बाजूने मोगलकसाचे देवस्थान या ठिकाणी शिवरात्रीच्या वेळी मोठी यात्रा भरते.<br>• त्यामुळे त्यांच्या धार्मिक भावना दुखावू नये म्हणून हा प्रकल्प होऊ नये, या प्रकल्पाला आमचा विरोध आहे. हा प्रकल्प जर या ठिकाणी राबविला तर मी सर्व गोंडवाना गणतंत्र पक्ष तर्फे महाराष्ट्रत आंदोलन करेन. हा प्रकल्प रदद करावा अशी विनंती केली. | |
| १६ | **श्री. रमेश कारमे**<br>• येथे आलेल्या अधिकाऱ्यांना माझी फक्त एकच विनंती आहे की, ही फक्त जनसुनावणी निमित्त राहू नये. जर तुम्हाला कसही करुन प्रकल्प राबवायचा असेल या मानसिकतेतून येता आणि जनसुनावणी होते. किरणापूर आणि काचुरवाही येथे याच प्रकारची जनसुनावणी घेऊन प्रकल्प लादला. त्यामुळे तेथील लोकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तिथे रोजगाराचा मोठा प्रश्न आहे.<br>• तुम्हाला एकच विनंती आहे की, हा अत्यंत नयनरम्य परिसर असल्यामुळे हा प्रस्ताव नाकारावा. मी या प्रकल्पाला विरोध करतो. या प्रकल्पामुळे जैव-विविधतेचे तसेच शेती सुध्दा प्रदुषीत होणार आहे. आमचा सरकारला इशारा आहे जर हा प्रकल्प राबविला तर सरकारला निश्चितच याला मोबदला चुकता करावा लागेल. | -- |
| १७ | **श्री. रेड्डी माजी आमदार**<br>• मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षेतेखाली आपले वने जिव सुरक्षित माध्यमातुन २ मे २०२३ ला या प्रकल्पाला मंजुरी दिली आणि पुढील मंजुरीकरिता आपण केंद्र सरकारकडे वन विभागाच्या मंजुरीकरिता आपण जाणार आहे. पुर्वी येथे खाणी सुरू होत्या नंतर साधारणत: १९५० ते १९६० दरम्यान बंद झाल्या.<br>• नवीन वनहक्क नियमाच्या अंतर्गत त्या बंद करण्यात आल्यात. जुन्या खाणी बंद करतात आणि नवीन चालू करतात. त्यामुळे गावकऱ्यांचे तसेच शेतकऱ्यांचे सुध्दा नुकसान होते. आमच्या | मा. अध्यक्ष महोदयांनी सांगितले की आपण जो आक्षेप नोंदविला आहे ही जन सुनावणी इनव्हॅलींड आहे याबाबत कोर्टामध्ये पी. आ. एल दाखल झालेली आहे व कोर्टाच्या निर्णयानुसार च आजची जनसुनावणी आपण घेत आहोत त्यामुळे आपले हे म्हणणे योग्य नाही. |

| | | |
|---|---|---|
| | शेतातील व गावातील लोकांना जो त्रास होणारआहे त्याबबदल आम्हाला बोलायच आहे. मी गावातील लोकांचे तसेच शेतकऱ्यांचे मुद्दे उपस्थित करणार आहे. जवळच मॅगनिज ओर इंडियाने परसोडीला खाण सुरू करुन नंतर बंद करुन टाकली कारण तेथे ग्रेट मिळाला नाही. केंद्र सरकारला आणि राज्य सरकारला किती फायदा होणार आहे स्थानिकांना याचा किती फायदा होणार आहे तसेच शेतकऱ्यांना याचा किती फायदा होणार आहे, रोजगार किती उपलब्ध होणार आहे. गुगलडोह, मांद्री व पंचाळा या परिसरात पाझर तलाव मोठ्या प्रमाणात आहे.<br>• प्रस्तावित खाणीमध्ये ब्लास्टींग केल्यास जमीन फाटण्याची शक्यता नाकारता येत नाही परिणामत: तलावात पाणी थांबणार नाही आणि आज जे शेतकऱ्याला जे पाणी मिळते ते पाणी मिळणार नाही आणि शेतकऱ्याचे नुकसान होईल, याची आपण दखल घेतली पाहिजे, फायदा होणार नाही. भूगर्भात स्फोट केल्यामुळे पाण्याची पातळी जमिनीत जाण्याची शक्यता आहे. खदान सुरु झाली तर आमचा या खाणीला विरोध आहे. अरुंद रस्त्यावर जड वाहतुक होणार आहे, खदाण सुरू झाल्यास रस्त्यांची दुर्दशा होईल.<br>• अरुंद रस्ता असल्याने येणाऱ्या जाणाऱ्यांना त्रास होईल, याचा विद्यार्थ्यांना गावकऱ्यांना तसेच शेतकऱ्यांना तसेच येणाऱ्या पिढींना त्रास होईल आणि पर्यावरण दुषित होईल. जेव्हा आपण ही खाण खोदणार आहे तेव्हा दुप्पट माती त्यामधून निघणार आहे त्यासाठी दीड पटीने जमीन डंपिंगसाठी लागणार आहे, यावरुन असे दिसून येते की, कुठेतरी नियमात बरोबर न बसविता हा प्रकल्प राबविला जात आहे. मुदत संपली असताना आपण ही लोकनुसावणी होत आहे, जी मुदत दिलेली आहे ती मुदत संपलेली आहे, ती संपली असतांना आपण सुनावणी घेत आहात, हा कंपनीचा अधिकार नाही आहे. असा आक्षेप घेतो. | |
| १८ | **श्री. संजय सत्तेकार, पत्रकार, कन्हान**<br>• सुरुवातीपासून मी शांतपणे ऐकत आहे. सर्वांनी आपआपले मते मांडली आहेत. आतापर्यंतचा माझा लोकसुनावणी चा निष्कर्ष असा आहे की, आपण किती ही प्रयत्न केला तरी आपल्या म्हणण्याप्रमाणे निर्णय होईल असे नाही. मी ठामपणे सांगू इच्छितो की, ९९.९ टक्के ही खाण झालेली आहे. या प्रकल्पाबाबत दोन मतप्रवाह आहे.<br>• प्रकल्प व्हायला पाहिजे या लोकांच्या तुलनेत विरोध करणाऱ्यांची तुलना जास्त आहे. अशा प्रकारच्या खाणीपासून फायदा झाला अशी एकही खाण नाही. प्रकल्पाबाबत सांगितलेली सगळेच काम होईल असे नाही. उद्या ही कामे झाली नाही तर आम्ही कोणाकडे दाद मागायची. जवळच चोखाडा आणि किरणापुरची खदान आहे, त्यावेळेस सांगितलेल्या कामापैकी एकही कामे व्यवस्थितरित्या झालेली नाही. भांडारबोडीमध्ये खोदुन ठेवला आहे त्याला अजून कुंपन नाही.<br>• येथे खाण झाल्यास स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल. स्वातंत्र्यकाळापूर्वी कोरड वाहु जेव्हा स्वातंत्र्यपुर्वी देशामध्ये पाच- | मा. अध्यक्ष महोदयांनी सांगितले की, हे मुददे सुरवातीला सांगितलेले आहे, आपण प्रकल्पाच्या पर्यावरणा विषयी बाबत बोलावे, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सहा धरण होती त्यावेळी साधारणत: १९०५ चा हा खिंडसीचा धरण आहे. या परिसरात सिंचनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण सागर प्रकल्प आज इतकी वर्षे होऊनसुध्दा हा प्रकल्प रखडलेला आहे. या प्रकल्पासाठी साधारणत: २७० एकर जागा लागणार आहे यामध्ये सोशल इम्पॅक्ट रिपोर्टची नोंद नाही. आज या २७० एकरच्या परिसरात आम्ही बकरी व गाय चारु शकतो जंगलातून इंधन जमा करु शकतो हा प्रकल्प झाल्यास त्याचा परिणाम यावर होईल, त्यांचा रोजगारावर परिणाम होईल.<br>• सी.एस.आर फंड हा एक कॅप्सुल आहे. ही छत्तीसगढची कंपनी आहे तेथे भरपुर कोळसा, मॅगनिज असून या कंपनीला या क्षेत्रामध्ये काय रस आहे. केंद्र सरकारकडून या कंपनीला एवढ्या लवकर कशी काय परवानगी मिळाली. माझा या प्रकल्पाला विरोध नाही जर कंपनीवाल्ले निव्वळ नफा कमविण्यासाठी जर येथे कंपनी आणत असेल तर या गावकऱ्यांना सुध्दा त्याचा फायदा झाला पाहिजे. | |

मा. अध्यक्ष महोदय यांनी सुचित केले की, आतापर्यंत आपण या प्रकल्पा व्यतिरीक्त गावकऱ्याच्या मुददेबाबत चर्चा केली, कंपनी प्रवर्तकांचे म्हणणे सुदधा आपण ऐकुण घ्यायला पाहिजे. आता आपणास फक्त प्रकल्पाविषयी बोलायचे आहे. तरी प्रकल्प प्रवर्तकांना विनंती केली की त्यांनी प्रकल्पाविषयी बोलावे.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर देण्यासाठी सुरूवात करताच गोंधळाला सुरूवात झाली आणि लोक सुनावणी बंद करावी लागली.

मा. अध्यक्ष तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, पर्यावरण लोकसुनावणी समिती यांनी समारोप प्रसंगी आपल्या अभिप्रायात असे नमुद केले की, लोकसुनावणीच्या वेळी उपस्थित केलेले सर्व मुद्दे जसेच्या तसे लोकसुनावनीच्या इतीवृत्तांतामध्ये समाविष्ट करून पुढील योग्य त्या कार्यवाही करीता सदरचा अहवाल पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासन हयांना सादर करण्यात येईल.

त्यांनतर आभार प्रदर्शन होऊन लोकसुनावणी पुर्ण झाल्याचे घोषित केले.

**(हेमा देशपांडे)**
सदस्य लोकसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, नागपुर

**(रा. उ. पाटील)**
समन्वयक लोकसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, नागपुर -१

**(सुभाष चौधरी)**
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, नागपुर.